# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३**

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: के-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**रूपये:- ३,८७,०२,९७,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (१) | ४९८७ | १० | जेजूरी औद्योगिक वसाहत येथे असून येथे बर्जर पेंट्स या रंग कंपनी मध्ये दि. ३०/१२/२०२२ रोजी रंग तयार करणाऱ्या कंपनीतील बॉयलरमध्ये पावडर गुळगुळीत करण्यासाठी लोखंडाचे गोळे फिरवले जातात. त्यातील गोळा बाहेर उडाल्याने रोहित जयवंतराव माने (वय २८ वर्षे रा. राख, ता. पुरंदर, जि. पुणे.) या कामगाराचा दुर्दैवी मृत्यू त्याचप्रमाणे यापुर्वी इंडियन सिमलेस या फोर्जिंग कंपनीमध्ये क्रेन ना-दुरूस्त असल्याने झालेला अपघात होणे, तसेच यापुर्वी आयएसएमटी व इतर कंपन्यांमध्ये होत असलेले अपघात याबाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करून जेजूरी औद्योगिक वसाहतीसह इतर ठिकाणच्या औद्योगिक वसाहतीमधील कुशल, अकुशल कंत्राटी कामगारांना वैयक्तीक सुरक्षा, कामकरीत असताना घ्यावयाची काळजी / सुरक्षा, मशनरी वापराबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक असणे, एखादी दुर्दैवी घटना घडल्यास जखमी कामगारास दिलासा, प्रथमोपचार कामगार दगावल्यास कुंटुंबियांना मिळणारे लाभ, विमा संरक्षणासाठी आपत्कालीन व्यवस्थापन समितीने तातडीने निर्णय घेऊन भविष्यात अपघाताच्या घटना थांबविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (२) | ४९७९ | १० | “गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसदारांच्या घराच्या प्रश्नावर राज्य सरकार उदासीन असल्याचा आरोप करत कामगारांनी मुख्यमंत्र्यांच्या घरावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतलेला असणे, दीड लाख कामगारांना कसे, कुठे आणि कधी घर देणार याबाबत राज्य सरकारने अद्यापही कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी राज्यातील हजारो गिरणी कामगारांच्या वारसांच्या मनामध्ये शासनाबद्दल पसरलेली नाराजीची भावना, हजारो विजेते गिरणी कामगार आणि वारसदारांना घरांचा ताबा अद्यापपर्यंत दिलेला नसणे, शेकडो विजेते कामगार गृहकर्जाचा समान मासिक हप्ता भरत असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३) | ४९८० | १० | "राज्यातील नोंदित बांधकाम कामगारांचे बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ तातडीने स्थापन करावे व लाखो प्रलंबित अर्ज निकाली काढावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटनेच्या संयुक्त कृती समितीने शासनाकडे वेळोवेळी केलेली असणे, तथापि याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बांधकाम कामगारांना दहा हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय करण्याची आवश्यकता, साठ वर्षे पूर्ण झालेल्या पुरुष व 55 वर्षे झालेल्या स्त्रिया अशा नोंदीत बांधकाम कामगाराला दरमहा 5000 रुपये पेन्शन देण्याची होत असलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (४) | ४९८२ | १० | "ठाणे जिल्ह्यातील बदलापूर पूर्व भागात वसलेल्या औद्योगिक वसाहतीत एका रासायनिक कंपनीला माहे फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात लागलेल्या आगीत तीन कामगार होरपळले असणे, गगनगिरी फार्मा केम या कंपनीत वेगवेगळ्या प्रकारची रसायने तयार केली जात असणे, तथापि पाच पाच अग्निशमन वाहन आणि दहा टँकरच्या साह्याने आग विजवण्यात आलेली असणे, परंतु जखमी झालेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात आलेली नसल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेली नाराजीची भावना यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (५) | ४९८३ | १० | "माहे जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात रायगड जिल्ह्यातील महाड एमआयडीसी मध्ये प्रचंड स्फोट होऊन मल्लक स्पेशलिटी कंपनीमध्ये लागलेली आग, सदर लागलेल्या आगीमध्ये तब्बल 11 कामगार जळाल्यामुळे गंभीर जखमी झालेले असणे, तसेच बाजूला असलेल्या ऑरगॅनिक आणि श्रीहरी केमिकल या कंपनीला देखील आगीची झळ बसून तेथील पाच कामगार जखमी झालेले असणे, तथापि, जखमी झालेल्या कामगारांना अद्याप पर्यंत कोणतीही नुकसान भरपाई मिळालेली नसल्यामुळे कामगारांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (६) | ४९८४ | १० | धूम्रपान विरोधी कायदा आणि कामगारांमध्ये वाढलेले आजार इत्यादी कारणांमुळे सोलापूरच्या विडी उद्योगातील कामगारांची संख्या प्रचंड प्रमाणामध्ये घटत असून एकेकाळी ७० हजार असलेली कामगार संख्या ४०००० वर पोहोचलेली असणे, परिणामी आगामी काळामध्ये सोलापुरातील विडी कामगार नामशेष होण्याच्या मार्गावर असणे, सुमारे दीडशे वर्षांची परंपरा असलेल्या विडी उद्योगाला त्यातही महिलांच्या हाताला काम देणारा उद्योग कोणत्याही मशीन शिवाय चालत असणे, विडी कामगार हे प्रामुख्याने अशिक्षित असणे, एकेकाळी दररोज पाच कोटी विड्यांची उत्पादन करणारा हा उद्योग कमी प्रमाणामध्ये उत्पादन करीत असणे, याचे कारण बाजारामध्ये नकली विडी येत असून त्याकडे विक्रीकर विभाग, कामगार विभाग आणि उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष होत असणे, नकली विडीवर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सरकारी यंत्रणांकडून कुठलीही कारवाई होत नसल्यामुळे अधिकृत विडीवर आलेले गंडांतर, बिडी कामगारांच्या अनेक पिढ्या या उद्योगावर अवलंबून असल्यामुळे यांच्या कल्याणाकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (७) | ४९८६ | १० | "महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडून ज्यांचे वय ५५ वर्षावरील आहे अशा पात्र घरेलू कामगारांना सन्मानधन म्हणून दहा हजार रुपये देण्याची होत असलेली मागणी, सन्मानधन मिळवण्यासाठी ठेवण्यात आलेल्या जाचक अटी सुलभ करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी तळागाळातील घरेलू कामगाराला सन्मान धनापासून वंचित राहावे लागत असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (८) | ४८६४ | १०० | राज्यातील कामगारांसाठी सुरू असलेल्या राज्य कामगार विमा दवाखान्यांची राज्यभरात वाईट अवस्था आहे अनेक दवाखान्याच्या इमारती मोडकळीस आलेले आहेत बऱ्याच रुग्णालयांमध्ये डॉक्टर वैद्यकीय कर्मचारी यांची कमतरता आहे राज्यातील कामगारांच्या पाल्यांना डॉक्टर होता यावे यासाठी कर्मचारी राज्य विमा मंडळाच्या रुग्णालयामध्ये प्रादेशिक विभागात प्रत्येकी एक वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती तसेच कामगारांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी राज्यस्तरीय समिती नियुक्त करण्याची घोषणाही शासनाने केली होती या समिती बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (९) | ४९५४ | १० | राज्यातील सिमेंट उद्योग व सिमेंट उद्योगावर आधारित दर वेगवेगळे असणे, सिमेंट बनविणारे उद्योग हे केंद्र शासनाच्याय अधिपत्याखाली असणे, सिमेंट पासून उत्पादन बनविणारे उद्योग हे लघु व मध्यम उद्योग असणे, या उद्योगांना एकच किमान वेतन लागू करणे, सिमेंट उद्योगातील कामगारांवर अन्याय झाला असणे, किमान वेतन कायद्याचे दर लागू करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, किमान वेतन दर लागू करण्याची आवश्यकता असणे, याकडे शासनाने केलले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक कामगार व कुटूंबियांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तातडीची व उपाययोजना." |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: के-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८०१, वीज**<br>**रूपये:- ८५,७५,५७,००,०००/-**<br>**श्री. बाळासाहेब आजबे** |
| (१०) | ४९५२ | १० | नवीन प्रस्तावित 220/33 के.व्ही. उपकेंद्र कडा (डोंगरगण) ता.आष्टी, जि.बीड मंजूर होणेबाबत वारंवार होत असलेली मागणी मा.ऊर्जा विभाग यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.27/04/2021 पासून मागणी करण्यांत येणे, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने अद्यापी कोणतीच कार्यवाही न करणे, यावर शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (११) | ४९२० | १० | हडपसर पुणे विधानसभा मतदारसंघाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात झालेले नागरिकीकरण,निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती आणि गृहनिर्माण संकुले,ह्या परिसरातील विद्युत वाहक तारा अद्यापही पूर्णत:भूमिगत केलेल्या नसल्यामुळे वारंवार तारा तुटून वस्त्यांवर पडून होत असणारे वारंवार खंडित होणारा विद्युत पुरवठा,या प्रकारांना आळा घालण्यासाठी हडपसर विधानसभा मतदारसंघातील शंभर टक्के विद्युत वाहक तारा भूमिगत करण्याची आणि त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता याकडे शासनाचे अक्षम्य झालेले दुर्लक्ष व शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (१२) | ४९२२ | १० | हडपसर पुणे विधानसभा मतदारसंघातील रास्ता पेठ विद्युत विभागाच्या कोंढवा शाखेच्या (सेक्शन) कार्यक्षेत्रात गेल्या काही वर्षांमध्ये विद्युत ग्राहकांची मोठ्या प्रमाणात वाढलेली संख्या,त्यामुळे हल्लीच्या यंत्रणेवर आणि कर्मचाऱ्यांवर येणारा ताण,वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा आणि ग्राहकांच्या विद्युत पुरवठा संदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपलब्ध कर्मचारी यंत्रणा कमी पडणे इत्यादी बाबींचा विचार करता कोंढवा शाखेचे(सेक्शन)विभाजन करून दोन शाखा(सेक्शन) निर्माण करण्याची आवश्यकता,शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष व शासनाची प्रतक्रीया. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (१३) | ४९३४ | १० | चिचोंडी ता. येवला येथे नवीन एमआयडीसी कार्यान्वित होत असणे, या एमआयडीसी मध्ये रस्ते, सांडपाणी व्यवस्था, पिण्याचे पाणी या पायाभूत सुविधा पूर्ण झालेल्या असणे, या ठिकाणी फक्त विद्युत उपकेंद्रांची पूर्तता होणे बाकी असणे, पुरेशा विजेच्या सुविधेअभावी ही एमआयडीसी सुरु करण्यासाठी अडचण निर्माण झालेली असणे, सदर एमआयडीसी मधील चिचोंडी येथे ५ एमव्हीएचे नवीन उपकेंद्र सुरु करणे हे काम आरडीएसएस योजनेमध्ये मंजूर असणे, चिचोंडी ता. येवला येथील नवीन एमआयडीसी कार्यान्वित करणे या कामाची निकड लक्षात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | घेवून हे काम टप्पा १ मध्ये घेवून प्रथम प्राधान्याने हाती घेण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ९ जानेवारी व दि. ९ फेब्रुवारी २०२३ रोजी मुख्य अभियंता महावितरण यांच्याकडे मागणी केलेली असणे, मात्र हे काम सुरु करण्यासाठी दिरंगाई व टाळाटाळ केली जात असणे, यावर शाशानाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ४९४० | १० | नाशिक जिल्ह्यातील कुसूर, सोमठाण देश व जऊळके ता. येवला जि.नाशिक येथे 5 MVA चे नवीन विद्युत उपकेंद्र सुरु करणे. येवला शहर व कोटमगाव ता. येवला जि.नाशिक येथे 5 MVA चे अतिरिक्त रोहित्र बसविणे हे महावितरणच्या पायाभूत सुविधांचे कामे कृषी धोरण (ACF) कृषी आकस्मिक निधी या योजनेतून सन २०२१-२२ मध्ये मंजूर झालेली असणे, येवला तालुक्यातील विजेचा पुरवठा सुरळीत होणेसाठी या कामांची अतिशय गरज असणे, सदर कामांची निविदा प्रक्रिया करून ही कामे लवकरात लवकर हाती घेण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ९ फेब्रुवारी २०२३ रोजी मुख्य अभियंता महावितरण यांच्याकडे मागणी केलेली असणे, मात्र हे काम सुरु करण्यासाठी दिरंगाई व टाळाटाळ केली जात असणे, त्याचप्रमाणे बल्हेगाव ता.येवला येथे 5 MVA चे नवीन विद्युत उपकेंद्र सुरु करणे आणि खडकमाळेगाव व मरळगोई खुर्द ता.निफाड जि. नाशिक या दोन ठिकाणी ५ MVA चे अतिरिक्त रोहित्र बसविण्याच्या कामांची निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन निविदा प्रस्ताव अनेक दिवसांपासून महावितरण मुख्यालयाकडे प्रलंबित असणे, सदर कामे लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ४९६४ | १० | पाटोदा ता.येवला जि.नाशिक येथे 1x50 MVA व 1x25 MVA चे 132/33 केव्ही अतिउच्च दाब उपकेंद्र (EHV Substation) करण्यासाठी महावितरणद्वारे महापारेषणला प्रस्ताव पाठविलेला असणे, येवला तालुक्यात मनमाड आणि येवला अतीउच्चदाब उपकेंद्रांमधून विद्युत पुरवठा केला जात असणे, या दोन्ही फिडरवर जास्त भार असल्यामुळे सद्यस्थितीमधील व भविष्यातील विद्युत भार पूर्ण करण्यासाठी या उपकेंद्रामध्ये क्षमता उपलब्ध नसणे, येवला तालुक्यात 33/11 केव्ही अंगुलगाव, बल्हेगाव, कुसूर, एमआयडीसी चिचोंडी, पिपळगांव जलाल, जऊळके व सोमठाण देश इत्यादी नवीन विद्युत उपकेंद्र प्रस्तावित असणे, नगरसुल, येवला व कोटमगाव उपकेंद्र येथे अतिरिक्त रोहित्र बसवण्याचे प्रस्तावित असणे, विद्यमान येवला अतिउच्चदाब सबस्टेशनवर नवीन Bays बसविण्यासाठी जागा नसणे, अतिरिक्त भारामुळे येवला सबस्टेशनमध्ये वारंवार व्यत्यय येत असणे, प्रस्तावित पाटोदा सबस्टेशनमध्ये येवला सबस्टेशनचे 2 फिडर वळवण्याचे प्रस्तावित असणे, त्याचप्रमाणे प्रस्तावित सात उपकेंद्रांसाठी सुध्दा EHV सबस्टेशनमधून वीजेचा पुरवठा केला जाणार असणे, यासाठी 132 केव्ही पाटोदा उपकेंद्राची स्थापना करणे अत्यंत आवश्यक असणे, त्यामुळे सध्याच्या 2 |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उपकेंद्रांचा भार सामायिक करण्यासाठी मदत होणार असणे, अतिरीक्त भारामुळे 132 केव्ही मनमाड उपकेंद्र आणि 132 केव्ही येवला उपकेंद्रामध्ये वारंवार येणारे व्यत्यय ग्राहकांना त्रासदायक ठरत असणे, मनमाड आणि येवला सबस्टेशन मधून वळवल्या जाणाऱ्या विद्यमान आणि प्रस्तावित 33 केव्ही सबस्टेशनच्या लोडचा विचार करता तांत्रिकदृष्ट्या 132 केव्ही पाटोदा उपकेंद्राची उभारणी अतिशय व्यवहार्य आणि आवश्यक असणे, पाटोदा, सावरगाव, विखरणी, तांदुळवाडी, जळगाव (नेऊर) ही 33 केव्ही गावे पाटोद्याच्या जवळ असणे, सदर पाटोदा अतिउच्चदाब विद्युत उपकेंद्रासाठी पिंपरी ता.येवला येथे ग्रामपंचायतीने मोफत जागा उपलब्ध करून दिलेली असणे, त्यामुळे पिंपरी, ता.येवला हे ठिकाण EHV सबस्टेशनसाठी तांत्रिकदृष्यासुध्दा योग्य असणे, पाटोदा ता. येवला जि.नाशिक येथे 132 केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्र (EHV Substation) स्थापन करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १९ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ४९८९ | १० | राज्यातील वस्त्रोद्योग व यंत्रमागाची वीज सवलत स्थगित ठेवण्याचे निर्देश महावितरणाने जारी केल्यामुळे राज्यातील सुमारे २२०० कोटी रुपयांची वीज सवलत बंद झालेली असणे, महावितरणने वस्त्र उद्योगाची वीज सवलत बंद केल्यामुळे राज्यात संतप्त प्रतिक्रिया उमटल्यामुळे वस्त्रोदयोग मंत्र्यांनी माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये राज्यातील २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक वीज जोडभार वापराची सवलत पुन्हा सुरु करण्याची केलेली घोषणा, सदर घोषणा करुन एक वर्षाचा कालावधी उलटत नाही तो २७ अश्वशक्तिपेक्षा कमी जोडभार तसेच मोठया वस्त्रोदयोगाची सवलत बंद करण्यात येणे, मागील ३२ वर्षापासून यंत्रमागासाठी वीज सवलत दिली जात असतांना महावितरणाने अचानक वीज सवलत स्थगित ठेवण्याचे दिलेले निर्देश, यासंदर्भात महावितरणाच्या मुख्य अभियंत्यानी १ मार्च , २०२२ रोजीच्या ई-मेल द्वारे सवलतीचे वीज बिल वितरण थांबविण्यात दिलेले आदेश, त्यामुळे यंत्रमागधारक व वस्त्रोदयोगाना विजेची बिले पूर्ण रक्कमेने भरावी लागणार असल्याने त्यांच्यात निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, सदर निर्णयाचा सर्वाधिक फटका वस्त्रोद्योगाला बसणे, यंत्रमागधारक व वस्त्रोद्योगधारकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण पाहता शासनाने याबाबत गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर कार्यवाही करुन राज्यातील २७ अश्वशक्तीपेक्षा अधिक वीज जोडभार वापराची सवलत सुरु करण्याबाबत व वस्त्रोद्योग व यंत्रमागधारकाची वीज सवलत स्थगिती उठविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (१७) | ४९९० | १० | बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे स्थित असलेल्या औष्णिक विद्युत प्रकल्प अंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात काही उमेदवारांना नोकरी देण्याचे प्रस्ताव अद्याप प्रलंबित असणे, याबाबत वेळोवेळी आंदोलने करण्यात आलेली असणे, सदर उमेदवारांच्या मागण्या, त्यांची वयोमर्यादा आदी बाबींचा विचार करून त्यांना तातडीने सेवेत सामावून घेण्याची होत असलेली मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| (१८) | ४९७३ | १०० | अंबाजोगाई तालुक्यातील वाघाळा येथे वाढलेला कृषी व अकृषी विजेचा वापर, त्यामुळे पुरवठा करणाऱ्या सबस्टेशनवर येत असलेला ताण व सततचा अपुरा वीजपुरवठा, यामुळे वाघाळा येथे नवीन 33/11 केव्ही उपकेंद्र मंजूर करून त्यास निधी उपलब्ध करून देण्याची होत असलेली मागणी व त्यावरील करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| (१९) | ४९७६ | १०० | अंबाजोगाई तालुक्यातील पाटोदा (म.) येथे वाढलेला कृषी व अकृषी विजेचा वापर, त्यामुळे पुरवठा करणाऱ्या सबस्टेशनवर येत असलेला ताण व सततचा अपुरा वीजपुरवठा, यामुळे पाटोदा (म.) येथे नवीन 33/11 केव्ही उपकेंद्र मंजूर करून त्यास निधी उपलब्ध करून देण्याची होत असलेली मागणी व त्यावरील करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| | | | **मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उद्योग**<br>**रूपये:- ३४,१६,७१,४३,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (२०) | ४९३२ | १० | महाराष्ट्र राज्यात रोजगार निर्मिती होवून राष्ट्रीय उत्पन्नात भर पडावी या हेतूने औद्योगिकरणाला महत्वाचे स्थान आहे. त्या दृष्टीने ग्रामीण व आदिवासी भागात औद्योगिकीकरणाला खुप वाव असून जळगाव जिल्हयातील मौजे पाल, ता. रावेर जि. जळगाव हे सातपुडा पर्वताच्या रागांमध्ये वसलेले आदिवासी गाव असून त्याला लागून पंधरा वीस छोटया मोठ्या खेडयांचा समूह असणे, पाल हे महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या सीमेवर असून गावातून औरंगाबाद चित्तोडगढ महामार्ग जातो. तिथून इंदूर दोनशे कि.मी. ब-हाणपूर पन्नास कि.मी. अंतरावर आहे. नजिकचे रेल्वे स्टेशन रावेर पंचवीस कि.मी. असून सर्व दृष्टीने हे गाव सोयीचे असणे, जळगाव भुसावळ जाण्यासाठी पक्के रस्ते असून या गावालगत औद्योगिक वसाहत झाल्यास या भागातील रोजगाराचा प्रश्न सुटायला व हा भाग अधिक विकसित व्हायला मोठा हातभार लागू शकेल. आपण या बाबींचा सहानूभूती पूर्वक विचार करुन पाल येथे औद्योगिक वसाहत मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२१) | ४९१३ | १० | भंडारा जिल्ह्यातील साकोली शहर हे नॅशनल हायवे लगत असून तालुक्यामध्ये MIDC (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) नसल्यामुळे येथील बेरोजगार युवकांचे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर शहरात व राज्यात होत असणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (२२) | ४९७७ | १० | "पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी जव्हार, मोखाडा, वाडा आणि विक्रमगड भागासाठी तातडीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करावी अशी मागणी होत असणे,या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन निर्माण झालेल्या पालघर या स्वतंत्र जिल्ह्यात मागील दहा वर्ष कालावधी होऊनही या भागातील हजारो आदिवासी तरुण पोटाची खळगी भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करीत असणे, जव्हार, मोखाडा आणि विक्रमगड या भागात कोणतेही मोठे उद्योग नसल्यामुळे वर्षातील आठ महिने येथील आदिवासी काम मिळविण्यासाठी स्थलांतर करीत असणे,परिणामी याभागात उद्योगधंदे उभारण्याकरता शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **मागणी क्रमांक: के-११**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४८०१, वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १६,३६,२६,००,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (२३) | ४९९५ | १० | पुरंदर-हवेली कार्यक्षेत्रातील पुरंदर तालुक्यात दोन सबडिव्हिजन व हवेली तालुक्यात १६ गावे मुळशी, रास्तापेठ, पद्मावती, बंडगार्डन या ४ सबडिव्हिजन मध्ये विभागलेली असणे, ही सबडिव्हिजन जाणे-येण्याच्या दृष्टीने सोयीस्कर नसल्याने ग्राहकांना आपल्या तक्रारींचे निवारण, व तांत्रिक अडीअडचणी करीता त्याचप्रमाणे प्रशासनाला काम करताना / ग्राहकांना सेवा सुविधा, तक्रारीचे निवार करताना खुप अडचणी येत असणे, त्यामुळे ही १६ गावे आंबेगाव व फुरसुंगी, ता. हवेली या ०२ सबडिव्हिजन मध्ये समाविष्ट करून पुरंदर तालुक्यात असलेलेली ०२ सबडिव्हिजन करीता एक नवीन वीज डिव्हिजन करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत करावयाची उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (२४) | ४९१४ | १० | "अमरावती जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीच्या अचलपूर विभागाचा भौगोलिक आकार विस्तृत असुन या विभागामार्फत ७ उपविभागीय कार्यालये, ४० वितरण केंद्र ३९ उपकेंद्र कार्यरत असणे , सदर विभागात विज ग्राहकांची संख्या २,००,१६८ इतकी असुन विभागाचे भौगोलिक क्षेत्र मोठे असल्याने विद्युत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विभागाच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर कामाचा व्याप अतिशय जास्त असून ग्रामीण तसेच शहरी भागात विद्युत प्रणालीवर परीणाम होऊन ग्राहकांच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत असणे , तसेच केंद्र आणि राज्य शासनाच्या वेगवेगळया योजनेअंतर्गत कामे प्रलंबित असणे , मे. क्रिसील मानकांनुसार विभागीय कार्यालयाकरीता १,००,००० विज ग्राहकांच्या प्रमाणात ४ ते ६ उपविभागीय कार्यालये असल्यास नवीन विभागीय कार्यालये निर्माण करता येईल अशी तरतुद असणे , दर्यापूर उपविभागीय कार्यालयात १० तक्रार निवारण केंद्रे असुन ४९.३३४ विज ग्राहक आहेत तसेच अंजनगाव उपविभागीय कार्यालयात ९ तक्रार निवारण केंद्रे असुन ४३,०२७ विज ग्राहक आहेत. दर्यापूर उपविभागाचे विभाजन करुन दर्यापूर उपविभाग क्र. १, दर्यापूर उपविभाग क्र. २ आणि अंजनगाव उपविभागाचे विभाजन करुन अंजनगाव उपविभाग क्र. १, अंजनगाव उपविभाग क्र. २ निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर असणे , अचलपूर विभागाचे विभाजन करुन नवीन दर्यापूर स्वंतत्र विभाग निर्माण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार ऊर्जा विभागाकडे लेखी पत्राद्वारे मागणी केलेली असणे , परंतु निधीअभावी सदर स्वंतत्र विभाग निर्माण करणे शक्य नसल्याचे ऊर्जा विभागाकडून लेखी पत्राद्वारे कळविले असणे , परंतु ३ ऑगस्ट २०२२ च्या कार्यकारी संचालक (मा.स.) यांच्या आदेशान्वये यवतमाळ विभागाचे विभाजन करून दारव्हा नवीन विभाग निर्माण करणे , परंतु दर्यापूर नवीन विभाग निर्माण करण्यास ऊर्जा विभाग उदासीन असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका “ |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १४ मार्च, २०२३**

**श्री.राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.